Chapter-7



प्रकरण ७ वें.

# अन्य भाषेंतील आत्मचरित्रें.

*** *** ***

असा तऱ्हेने आधुनिक आत्मचरित्राचा परिचय करून घेतल्यानंतर भाषांतरित आत्मचरित्राबद्दल लिहिणें अनुचित होणार नाही. कारण मराठींत आत्मचरित्रें लिहिलेल्यांनी पाश्चिमात्य वाङ्‌मयांतील आत्मचरित्रें वाचल्याचा उल्लेख केलेला आहे. त्यांतल्यात्यांत साहित्यसम्राट न.चिं.केळकर यांनी उपलब्ध झालीं तेवढीं बहुतेक आत्मचरित्रें वाचलीं होतीं असें म्हटलें आहे. तेव्हा अन्य भाषेंतून जीं आत्मचरित्रें मराठींत भाषांतर रूपानें आलेली आहेत त्यांचा उल्लेख करणें हें ओघानेंच प्राप्त झालेलें कृत्य होय.

तसेंच भारतातील अन्य भाषांतील आत्मचरित्रांचें व इतर अनेक ग्रंथांचें मराठींत भाषांतर होणें आवश्यक आहे. आज हिंदी ही राष्ट्रभाषा झालेली आहे. परंतु प्रांतीय भाषांचें महत्त्व कोणत्याही प्रकारें कमी होणार नाही अशी दखल घेण्यात येईल अशी ग्वाही राज्यघटनेतर्फे देण्यात आली आहे. अशा वेळी राष्ट्रीय भाषेचे व अन्य प्रांतीय भाषांचे संबंध जिव्हाळ्याचे असणें अत्यंत आवश्यक आहे. हे जिव्हाळ्याचे संबंध अधिकाधिक दृढ होण्यासाठीं प्रांतीय भाषेंतील महत्त्वाचे ग्रंथ हिंदींत भाषांतर

रुपानें आणणें आणि हिंदीतील मौलिक ग्रंथांचें प्रांतीय भाषांत भाषांतर करणें हें कार्य फार महत्त्वाचें आहे. तसेंच प्रांतीय भाषांनी आपापसांत अशीच देवाण घेवाण सतत करीत राहणें ही ही बाब जरुरीची आहे. त्यामुळे आपल्या या खंड-प्राय देशांत बंधुभाव निर्माण व्हायला आणि आपण सारे एकाच भारतमातेची लेकरें आहोत याची जाणीव दृढ व्हायला मदत होईल.

या साठीं प्रांतीय भाषांत जीं उत्कृष्ट पुस्तकें असतील त्यांत आत्म चरित्रेंही आलीच. त्यांचीं मराठींत भाषांतरें होणें आवश्यक आहे. परंतु भाषांतर करणें दिसतें तेव्हढें सोपें नाही. कारण भाषांतर करणाऱ्याचें दोन्ही भाषेंवर प्रभुत्व पाहिजे. ज्या भाषेंतील ग्रंथांचें भाषांतर करायचें तिचें ज्ञान असायलाच पाहिजे कारण त्या शिवाय त्या ग्रंथाचें अंतस्वरूप ओळखता येणार नाही. तसेंच ज्या भाषेंत भाषांतर करायचें तिचेंही चांगलें ज्ञान पाहिजे. त्याशिवाय सरस भाषेंत भाषांतर करता येणार नाही. या शिवाय भाषांतर करणाऱ्या मनुष्याच्या ठिकाणी ज्या व्यक्तीच्या ग्रंथाचें भाषांतर करायचें तिच्याबद्दल आपुलकी असायला पाहिजे. जिव्हाळा असल्याशिवाय त्या आत्मचरित्रकाराच्या जीवनाशी तो भाषांतरकार एकरूप होऊं शकणार नाही. यास्तव या दोन्ही गोष्टी म्हणजे दोन्ही भाषांचें सखोल ज्ञान आणि ग्रंथकर्त्याबद्दल आपुलकी या गोष्टी अवश्य पाहिजेत.

कांहीं थोर भारतीय पुरुषांचीं आत्मचरित्रें जीं त्यांच्या मातृभाषेंत लिहिलीं गेलीं त्यांचीं मराठींत भाषांतरें झालीं आहेत. जसें महात्मा मोहनदास

करमचंद गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, राष्ट्रपती डॉक्टर राजेन्द्र प्रसाद यांच्या आत्मचरित्रांचीं भाषांतरें मराठींत झालेलीं आहेत. तसेंच आणखी अशी कितीतरी आत्मचरित्रें इतर भारतीय भाषांत आहेत की त्यांचा अनुवाद मराठींत होणें आवश्यक आहे. आज नाहीं तरी पुढे या भारतीय भाषांचा संबंध अधिकाधिक वाढत जाईल आणि पुढे या ग्रंथांचा अनुवाद मराठींत होईल यांत शंका नाहीं.

येथे फक्त एका ग्रंथाचा अगदी थोडक्यांत परिचय करून देण्याचें ठरविलें आहे. तो ग्रंथ म्हणजे 'सत्याचे प्रयोग' हा होय. या जगत्‌प्रसिद्ध ग्रंथाची ओळख पुष्कळांना आहे. परंतु तो ग्रंथ अप्रतिम कां आहे हें पुन्हा पुन्हा सांगणें आवश्यक आहे. या ग्रंथांत इतरत्र महात्मागांधींचें आत्मचरित्र उत्कृष्ट कां आहे याची चर्चा केलेली आलेली आहे. येथे या ग्रंथाची थोडक्यांत ओळख करून दिली म्हणजे पुरे.

१ सत्याचे प्रयोग

१ गोपाळ कृष्ण गोखले गंगेप्रमाणें.

गांधीजी इंग्लंड मधून बॅरिस्टर होऊन आल्यावर काही वर्षें दक्षिण आफ्रिकेंत राहिले. तेथून आल्यावर त्यांनीं हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांच्या गांठी भेटी घेतल्या. पुण्याला जाऊन त्यांनी लोकमान्य टिळक, डॉक्टर भांडारकर

व नामदार गोखले यांच्या भेटी घेतल्या. त्या बद्दल ते लिहितात "मुंबईहून मी पुण्याला गेलों. तेथे दोन राजकीय पक्ष होते. मला तर सर्वांची मदत हवी होती. मी लोकमान्यांना भेटलों. त्यांना माझा विचार पसंत पडला. त्यांनी प्रोफेसर भांडारकर व प्रोफेसर गोखले यांना भेटायला सांगितलें. मी गोखल्यांना भेटलों. त्यांनी माझ्याशी मोठ्या प्रेमळपणाची वर्तणूक केली. त्यांची माझी ही प्रथमच भेट होती तरीही कां कुणास ठाऊक पण पूर्वीही त्यांच्याशी अनेक भेटीगाठी झालेल्या आहेत असेंच मला वाटलें. सर फिरोजशहा मेहता हे मला हिमालयाप्रमाणें वाटलें तर लोकमान्य समुद्राप्रमाणें भासले. परंतु गोखले मात्र गंगेप्रमाणे वाटले. गंगेंत मी न्हाऊ शकत होतों, परंतु हिमालयावर मी चढण्याची शक्यता नव्हती आणि समुद्रांत बुडण्याची भीती वाटत होती. परंतु गंगेच्या पाण्यांत डुंबण्यात मौज होती. राजकीय क्षेत्रांत गोखल्यांच्याविषयी ते जिवंत होते तों पर्यंत मला जो आदर वाटत होता, तोच आदर ते दिवंगत झाल्यावरही तसाच कायम राहिला."

## २ ब्रह्मचर्य पालन करायचें असेल तर

ब्रह्मचर्य व्रताचें पालन करूं इच्छिणारे पुष्कळ जन असतात. परंतु खाणें पिणें आणि वागणें यांचा संबंध ब्रह्मचर्याशी आहे यांत शंका नाही. उन्हाळा असतांना हिवाळा आहे असें समजणें हे जसें व्यर्थ आहे तसेंच खाणें पिणें आणि वागणें

यात संयम न ठेवता ब्रम्हचर्य पालन करता येईल असें समजण्यासारखें आहे. संयमी आणि स्वैराचारी, त्यागी आणि भोगी यांच्यात फार अंतर आहे. ब्रम्हचर्याचा अर्थ असा की काया, वाचा आणि मन या सर्वांचा संयम करणें. या सर्वांचा संयम करण्यासाठी त्यागाची फार आवश्यकता आहे. आणि त्याग किती करावयाचा याला काही मर्यादा नाही. जो पर्यंत आपल्या मनात आपल्या इच्छेविरुद्ध विचार येतात तो पर्यंत ब्रम्हचर्य व्रताचें पालन होणें असंभव आहे. पहिली गोष्ट म्हणजे विचारावर प्रथम नियंत्रण पाहिजे. कारण विकारावर विजय मिळवावयाचा तर प्रथम विचार आपल्या ताब्यात असलेच पाहिजेत. विचाराला ताब्यात ठेवायचे म्हणजे आपलें मन आपल्या काबूत पाहिजे. परंतु मन ताब्यात ठेवणें म्हणजे वायूला बांधून ठेवण्यासारखें आहे. अर्थात हे असंभव कोटीतलें मात्र नाही.

येथे हिंदुस्थानात आल्यावर मला हळूहळू असें वाटू लागले की या गोष्टीला परमेश्वराचेंही सहाय्य पाहिजे. माझ्या प्रमाणेच ईश्वरावर भरवसा ठेवणाऱ्याला ब्रम्हचर्यव्रताचें पालन करायचें असेल तर तें असंभव कोटीचें वाटण्याचें काही कारण नाही. कारण रामनाम आणि रामकृपा या गोष्टी आत्म्याच्या उन्नती साठी अत्यावश्यक आहेत.

## २. कलकत्ता येथील कॉंग्रेस

कलकत्ता येथे गेल्यावर तेथील स्वयंसेवक मला रीपन कॉलेजमध्ये घेऊन गेले. तेथे प्रतिनिधींना थांबण्यासाठी जागा देण्यात आली होती परंतु विशेष व्यवस्था नव्हती.

कॉंग्रेसचें अधिवेशन सुरू व्हायला एक दोन दिवसांचा अवधी होता. तोपर्यंत कॉंग्रेसच्या कार्यालयांत जाऊन काही सेवा करावी असें मला वाटलें. म्हणून मी त्याच दिवशीं स्नान वगैरे आटोपून कॉंग्रेस कार्यालयांत गेलों. तेथें श्री भूपेंद्रनाथ वसू आणि श्री घोषाल हे मंत्री असले होते. मी श्री भूपेंद्र बाबूंच्या जवळ गेलों. त्यांनी मला घोषाल बाबूंकडे जायला सांगितलें. मी त्यांच्या जवळ गेलों. त्यांनी माझ्याकडे निरखून पाहिलें व जरा हसून म्हणाले " माझ्या जवळ कारकुनाचें काम आहे. आपण कराल काय ? "

मी म्हणालों, " काय हरकत आहे मी करीन."

घोषाल बाबूंनी पत्रांचा ढीग माझ्यासमोर टाकला.

माझ्यावर टाकलेला हा विश्वास पाहून मी खूष झालों.

मी लागलीच त्या पत्रव्यवहाराचा फडशा पाडला म्हणून घोषाल बाबू खूष झाले. माझा पूर्व इतिहास कळल्यावर माझ्याकडे कारकुनाचें काम सोपविल्याबद्दल त्यांना त्याचीच शरम वाटू लागली. परंतु मी त्यांना काहीही म्हणालों नाही. उलट त्यांचे माझे संबंध दृढ झाले. पुढे माझा अनेक नेत्यांबरोबर परिचय झाला. मला पुष्कळ गोष्टी कळू लागल्या. त्यावेळीं इंग्रजी भाषेचें प्राबल्य फार होतें. वेळ पुष्कळदा उगीचच खर्च होत होता. त्यामुळे काही महत्त्वाचीं कामें तशींच राहून जात होतीं, आणि काही निरर्थक कामें खूप केलीं जात होतीं.

## ४ एक पुण्य स्मरण.

आमच्याकडे एक ख्रिस्ती गृहस्थ रहायला आले. प्रत्येक खोलींत स्वतंत्र मोरी नव्हती. म्हणून लघवीसाठी भांडें ठेवलें होतें. तें भांडें उचलायचें काम आम्ही पती

पत्नीच करीत होतों. या विस्ती मनुष्याचें लघवीचें भांडे उचलणें अर्थातच पत्नीच्या फार जिवावर आलें. याबद्दल गांधीजी लिहितात .....

" तें भांडें केवळ उचलून नेण्यात मला समाधान नव्हतें. तर तें भांडें तिनें खुषीनें उचलून न्यावें असें मला वाटे. म्हणून मी जरा उंच स्वरात म्हणालों" "माझ्या घरात हें असे चालणार नाही."

या बोलण्यानें कस्तूरबाच्या हृदयाला घरें पडलीं.

पत्नि म्हणाली " तर मग तुमचें घर तुमच्या जवळच ठेवा, मी आपली जाते. "

मला ईश्वराचेंही भय वाटलें नाही. त्यामुळे माझ्या मनात दया मायाही राहिली नाही. म्हणून मी तिचा हात धरून तिला दरवाज्याजवळ घेऊन गेलों, आणि दरवाजा अर्धा उघडला.

त्या वेळी कस्तूरबाच्या डोळ्यातून गंगायमुना वहात होत्या. ती म्हणाली " तुम्हाला लाज नाही पण मला आहे. तुम्हाला थोडीही शरम वाटत नाही की मी बाहेर जाऊन आता कुठे जाणार ? इथे आई बापही नाहीत की मी त्यांच्याकडे जाऊं. मी स्त्री आहे या साठीं मला हें सहन करावें लागत आहे. आता जरा लाज धरा नि दरवाजा बंद करा. नाहीतर कोणी पाहिले-बिहले तर तुमची नि माझी अशी दोघांचीही शोभा राहणार नाही. "

अशा तऱ्हेनें त्या दिवशी पत्नीनेंच मला अक्कल शिकविली.

## ५ परमेश्वराचा प्रसाद पाहिजे

आतापर्यंत मी ब्रह्मचर्य पालनासाठी आहार व उपवास यांचा निकट संबंध आहे हें सांगितलें आहे. तरीही हें सांगितलें पाहिजे की मन हेंच सर्वांचे

मूळ आहे. पापी मन उपवासानेही शुद्ध होणार नाही. या करिता म्हणजे मन शुद्ध होण्यासाठी शुद्ध विचार, भगवंताचें ध्यान आणि परमेश्वराचा प्रसाद या तिघांची आवश्यकता आहे.

## ६ आत्मशुद्धीशिवाय आत्मोन्नती नाही

आत्मशुद्धीशिवाय सर्व प्राणीमात्रा बरोबर आपण एकरूप होऊं शकत नाही. आत्मशुद्धीशिवाय अहिंसेचें पालन होणें शक्य नाही. मला वाटतें की पापी मनुष्याला परमेश्वराचें दर्शन होणें शक्य नाही. यास्तव आयुष्यातील कोणत्याही क्षेत्रांत आत्मशुद्धीची आवश्यकता आहेच आहे. उलट एक शुद्धाचरणाचा मनुष्य अनेक व्यक्तींच्या ठिकाणी तशी भावना निर्माण करूं शकतो. म्हणूनच व्यक्तीगत प्रयत्न करून उन्नति करून घेण्याची शक्ति प्रत्येकाच्या ठायीं दिलेली आहे.

परंतु हा आत्मशुद्धीचा मार्ग बिकट असल्याचा अनुभव मला प्रतिदिन येत आहे. काया, वाचा आणि मन यांची शुद्धि म्हणजेच रागलोभ इत्यादि विकारापासून मुक्त होणें होय. यासाठी क्षणाक्षणाला तसा प्रयत्न करणें अत्यावश्यक आहे. म्हणूनच कोणीही माझी स्तुति केली तरी माझ्या दोषांची मला जाणीव असते. याच कारणास्तव मला स्तुती आवडत नाही आणि स्तुतीमुळे मी फुगूनही जात नाही. मनातील विकारांना जिंकणें हें जगातील युद्ध जिंकण्यापेक्षाही कठीण आहे.

येथे हिंदुस्थानात आल्यावर माझ्या विचार विकाराकडे पाहून मला दुःख झालें आहे. परंतु अजूनही मी हार खाल्ली नाही. सत्याचे प्रयोग करण्यात

मी मग्न झालों आहे आणि आम्ही तेच चालू आहे. अजूनही पुष्कळ खडतर मार्ग ओलांडायचा आहे याची मला जाणीव आहे. यासाठी मला निरभिमान झालें पाहिजे. जो पर्यंत मनुष्य लीन होणार नाही तो पर्यंत त्याला मुक्ति मिळणें मुष्कील आहे. म्हणूनच अहिंसा ही नम्रतेची जननी आहे. अशी नम्रता माझ्या ठिकाणी यावी म्हणून माझी प्रार्थना आहे आणि जगातील सर्व बांधवांनी या बाबत मला सहाय करावे अशी प्रार्थना आहे."

## २ इंग्रजी भाषेतील आत्मचरित्रें

आपल्या मराठी भाषेत आत्मचरित्रांची आणि चरित्र वाङ्मयाची जी वाढ झालेली आहे ती इंग्रजी वाङ्मयामुळे झाली हे आपण पूर्वी पाहिलेच आहे. इंग्रजीतील काही आत्मचरित्रांची यादी पुढे दिलेली आहे. पाश्चिमात्य देशांतील काही आत्मचरित्रें मूळचीं अन्य भाषेतून असली तरी आपल्या कडील लोकांनी त्यांचा इंग्रजी अनुवादच प्रथम वाचला. म्हणून त्या आत्मचरित्रांचा इंग्रजी भाषेतील आत्मचरित्रांच्या यादीतच समावेश केला आहे.

### इंग्रजी भाषेतील काही आत्म - चरित्रें.

(1) Autobiography - Andrew Carnegie (2) Autobiography - Chesterton. (3) Autobiography - Gibbon. (4) Autobiography - Snowden P.V. (5) Autobiography - Spencer H. (6) Autobiography - Tolstoi. (7) Autobiography - Franklin. (8) A Year More or Less - Joad C.E.M. (9) Confessions - Rousseau (10) Experiments In Autobiography - - Wells H.G. - (11) Half Way - Sesil R. (12) Left Hand Right Hand - Sitwell O. (13) My Life - Duncon (14) Not I But The Wind -

Lawrence F. (15) Story of My Life - Keller H. (16) Something of Myself - Kipling Rudward. (17) The Story of My Life-Jaykar M.R. (18) Trial And Error - Weizmann (19) Twenty Five - Beverlie N. (20) World Within World - Spender.

## ३ हिंदी भाषेतील आत्मचरित्रें.

आता भारतातील अन्य भाषेतील काही आत्मचरित्रांची यादी येथे देतो. तिचा उपयोग अधिक अभ्यास करण्यासाठी जिज्ञासूस होऊं शकेल.

| | आत्मचरित्राचें नांव. | लेखकाचें नांव. |
|---|---|---|
| १ | आत्मकथा. | डॉक्टर राजेंद्र प्रसाद. |
| २ | मेरा जीवन प्रवाह | श्री वियोगी हरी. |
| ३ | प्रवासी की आत्मकथा. | श्री भवानीलाल. |
| ४ | मेरी जीवन यात्रा. | श्री राहुल. |
| ५ | मेरी असफलताएँ | श्री गुलाबराय. |
| ६ | मेनीरें और दीवारें | श्री रामवृक्ष बेनीपुरी. |
| ७ | मेरी आत्मकहानी | श्री श्याम सुंदरदास. |
| ८ | मेरा जीवन संघर्ष | श्री वेद मेहता. |
| ९ | आत्मकथा अर्थात् आपबीती जगबीती | श्री नरदेव शास्त्री. |

## ४ गुजराती भाषेतील आत्मचरित्रें

गुजराती भाषेतील आत्मचरित्रांची यादी पुढे दिली आहे. अर्थात ही त्रोटक अशी आहे. आणखीही आत्मचरित्रें प्रत्येक भाषेत आहेत. त्या सर्वांची

यादी देण्याची आवश्यकता नाही. काही प्रमुख नांवें पुढील प्रमाणें आहेत.

१ सत्यना प्रयोगो अथवा आत्मकथा ... महात्मा गांधी.

२ आत्मकथा भाग १ ते ३ ... इंदुलाल याज्ञिक.

हें आत्मचरित्र आदर्श मानलें जातें. यांत गेल्या पन्नास वर्षांचा सामाजिक इतिहास आलेला आहे.

३ अडधे रस्ते
सीधां चढाण
स्वप्न सिद्धिनी शोधमां ... कनैयालाल मुनशी.

या आत्मचरित्रांतून लेखकाचा अहंकार दिसून येतो. कारण सर्वत्र स्वतःचें समर्थन आहे. हें गालबोट या आत्मचरित्राला लागलें आहे. थोडेंसें 'गतगोष्टी' सारखेंच.

४ जीवनपथ भाग १ व २ ... धूमकेतु.

हें एक चांगलें आत्मचरित्र आहे.

५ बांधि गठरिया
छोड गठरिया
सफर गठरिया ... चन्द्रवदन मेहता.
हेंही एक चांगलें आत्मचरित्र आहे.

## ५ : कानडी भाषेंतील आत्मचरित्रें :

१ हुटु वरुण - Ten Years - ... श्री. जी. पि. राजरत्नम्

प्रकाशक .. मनोहर ग्रंथ प्रकाशन .. धारवाड

२ नन्न जीवन स्मृतिगळु ( Memories of my Life )

- श्री आलूर वेंकटराव -

३ साहित्यकार आत्मकथन - Autobiographies of 11 Literary Figures -

प्रकाशन .. मिंचिन बळ्ळि धारवाड.

४ हुच्चु मनसिन हत्तु मुखगळु .. Ten Faces of Strange Minds

- श्री के शिवराम कारंत

५ केल्वु तेन पुगळु .. Some Memories.

श्री नवरत्न रामराव

६ बिडुगडेय बेळे .. A Diary of a Congress - Volunteer who was Released From Jail.

- श्री बडगेन हळ्ळी. -

७ सेरेय मरेयल्ली - Behind The Bars

- श्री रंगराव दिवाकर

## ६ मल्याळी भाषेतील आत्मचरित्रे

१ Kazhinja Kalam - ( कळिंज कालम )
( Meaning The Time That Is Past ) by Shri K.P.Kesav Menon.

२ Jeevitha Smaranagal - जीवित स्मरणकळ
(Meaning - Memoirs) by - E.V.Krishna Pillai.

७

## उर्दू भाषेतील आत्मचरित्रें

| | | |
|---|---|---|
| १ ज़िक्रेमीर | ... | श्री मीर तकीमीर |
| २ एमालनामा | ... | सर सैयद रज़ाअली |
| ३ तज़्किरा | ... | मौलाना अब्दुल कलम आझाद |
| ४ एक नादिर रोज़नामचा | ... | डॉ. नूरुल हसन हा शर्मा |
| ५ तज़्किराए गोसिया | ... | गोसलिया कलंदर |